# कुळगांव बदलापूर नगरपरिषद

मध्यवर्ती मुख्य कार्यालय, पहिला मजला, जनता विद्यामंदिर रोड, श्रमसाफल्य सोसायटी समोर, कुळगांव (पूर्व), ता.अंबरनाथ, जि.ठाणे.
ईमेल:- coud.kulgaonbadlapur@maharashtra.gov.in, वेबसाईट:- http://cbmc.gov.in

संदर्भ: क्र.कुबनप/नरवि/ 6934 /२०१८-२०१९

दिनांक : 09/10/२०१८

प्रति,

श्री. विनोद प्रकाशनाथ तिवारी
शॉप नं.५, साई श्रध्दा कॉलनी,
कैलासनगर बस स्टँड, विठ्ठलवाडी,
खडेगोळवली, कल्याण (पूर्व)

**विषय:- गट नं.१२, हि.नं.१ पैकी, मौजे सोनिवली, ता.अंबरनाथ मध्ये बनविण्यात येणारे २४ से हाऊस व एक G+१ इमारत CHALETS AVENUE मध्ये विकासक द्वारा अनाधिकृत बांधकाम व नियमास अनुसरुन न झालेली बांधकामे रद्द करणेबाबत वारंवार तक्रार करुन देखील कार्यवाही होत नसलेबाबत दि.०३/१०/२०१८ ते कार्यवाही होईपर्यंत नगर परिषद कार्यालयाबाहेर साखळी उपोषण करणार असल्याबाबत.**

संदर्भ :- १) आपलेकडील या कार्यालयास दि.०८/०१/२०१८ रोजी पत्र,
२) आपलेकडील या कार्यालयास दि.०४/०६/२०१८ रोजी पत्र,
३) आपले पत्र क्र.२०१७-२०१८/AUG/०१, दि.२९/०८/२०१८.

उपरोक्त विषयान्वये आपण गट नं.१२, हि.नं.१ पैकी, मौजे सोनिवली, ता.अंबरनाथ मध्ये अनाधिकृत बांधकाम व नियमास अनुसरुन न झालेली बांधकामे रद्द करणेबाबत वारंवार तक्रार करुन देखील कार्यवाही होत नसलेबाबत दि.०३/१०/२०१८ ते कार्यवाही होईपर्यंत नगर परिषद कार्यालयाबाहेर साखळी उपोषण करणार असल्याबाबत संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये या कार्यालयास कळविले आहे.

त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, या प्रकरणात अनाधिकृत बांधकाम थांबविणेबाबत या कार्यालयाने संबंधिताला नोटीस दिलेली आहे तसेच सदर प्रकरणात संबंधित विकासकाने न.प. विरुध्द मा.न्यायालयात याचिका (क्र.२३७/१८) दाखल केलेली आहे. सबब, सदर प्रकरण आता न्यायप्रविष्ठ असल्याने प्रकरणी या कार्यालयास पुढील कारवाई करता येत नाही. त्यामुळे विषयांकित प्रकरणी आपण उपोषण करु नये, ही विनंती.

नगर परिषद - बदलापूर कुळगांव

मुख्याधिकारी,
कुळगांव-बदलापूर नगरपरिषद
कुळगांव.

प्रत :- मा.वरीष्ठ पोलिस निरीक्षक, कुळगांव (पूर्व)